नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१३
फेब्रुवारी २०२१

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार,दि.१६/२/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता मा.महापौर,मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.तसेच या कालावधीत मे.महाराष्ट्र शासन यांचे मा.मुख्यसभेस प्रत्यक्ष उपस्थितीबाबत आदेश आल्यास सदरची मासिक सभा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

'' नियुक्त्या ''

<u>विषय क्र. ३९७</u>

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० पोटकलम(३) अन्वये १ मार्च २०२१रोजी दुसऱ्या प्रहरी कार्यनिवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या ८ (आठ) मा. सभासदांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (५) अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील पक्षांच्या किंवा गटांच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देऊन नविन ८ (आठ) मा. सभासदांच्या नियुक्त्या करणे.''

**प्रश्नोत्तरे**

**महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.**

**<u>शहर सुधारणा समितीचे ठराव</u>**

<u>विषय क्र.३९८</u>

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ TDR /४९५, दि. १४/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०६, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे वडगांव खुर्द येथील स.नं.५८/५ (पैकी) | २४ मी. डी.पी. रोड | १) मे. ब्ल्यु कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे सचिन सुमतिलाल लोढा, २) आनंद अशोक नहार ३) मयुरेश भागवत मरळे | विरळ वस्ती | ६७५.०० चौ.मी. | ६७५.०० चौ.मी X २.०० = १३५०.०० चौ.मी | ००५८०३ | नोव्हेंबर २०२० |

विषय क्र.३९९

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/४९६, दि. १४/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०७, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे धानोरी, स.नं. ७/१ (पैकी), ७/२ (पैकी) आणि ७/२/१ (पै) | पीएच/ एचडीएच १८- | ए प्लस डिझाईन हाउस एलएलपी तर्फे भागीदार रोहित घनशाम गुप्ता | विरळ वस्ती | स.नं. ७/१ (पै) १५२००.०० स.नं ७/२ (पैकी) १६०००.०० स. नं. ७/२/१ (पै) १६००.०० | ८९२४.०७ चौ.मी X २.०५ = १८२९४.३४ चौ.मी | | नोव्हेंबर २०२० |
| | | | | | | १००००.०० चौ.मी | ००५७९६ | |
| | | | | | | २०००.०० चौ.मी | ००५७९७ | |
| | | | | | | २०००.०० चौ.मी | ००५७९८ | |
| | | | | | | २०००.०० चौ.मी | ००५७९९ | |
| | | | | | | २०००.०० चौ.मी | ००५८०० | |
| | | | | | | २९४.३४ चौ.मी | ००५८०१ | |

विषय क्र.४००

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५२७, दि.२४/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०९, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **आरक्षणाचा सर्व्हे नंबर** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचे नाव** | **टिडी आर झोन** | **७/१२ उता-या नुसार क्षेत्र** | **क्षेत्र चौ.मी** | **डीआर सी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बाणेर येथील स. नं. ५२/४/१/१७ (पैकी) | प्लेग्राउंड (पी.जी.-५) | श्री. सुधीर तुकाराम पाटील | विरळ वस्ती | ३७८.७१ चौ.मी | ३६५.६० चौ.मी X २.२० = ८०४.३२ चौ.मी | ००५७६८ | नोव्हेंबर २०२० |

विषय क्र.४०१

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५३६, दि.३०/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.११०, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उता-या नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बालेवाडी, स. नं. २४/१/१० | ३० मी.डी.पी. रस्ता | किशोर गोविंदराव कान्हेरे | विरळ वस्ती | २००.०० चौ.मी | १७०.०० चौ.मी X २.२० = ३७४.०० चौ.मी | ००५११७ | डिसेंबर २०२० |

विषय क्र.४०२

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५३७, दि.३०/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१११, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उता-या नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाणेर येथील स. नं. ५२/४/१/२६ | प्लेग्राउंड (पी.जी.-५) | श्री. राहुल तानाजी कलाटे | विरळ वस्ती | ४५५.०० चौ.मी | ४५५.०० चौ.मी X २.००= ९१०.०० चौ.मी | ००५७८६ | डिसेंबर २०२० |

विषय क्र.४०३

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५३८, दि.३०/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.११२, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **आरक्षणाचा सर्व्हे नंबर** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचे नाव** | **टिडी आर झोन** | **क्षेत्र चौ.मी** | **डीआर सी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे धानोरी स. नं.४५, सि.स.नं.१ ते ४९ | झोपडपट्टी पुर्नवसन योजना | मे. ब्ल्यूरेज डेव्हलपर्स एल.एल.पी. | सुधारित नियामावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ३१३६३.८३ चौ.मी. (इमारत ‘P, Q, L, M’ करिता जोते तपासणी पोटी देय २५% देय टीडीआर) | ००४६०२ | डिसेंबर २०२० |

विषय क्र.४०४

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५३९, दि.३०/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.११३, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, हडपसर स. नं. १३२/ २+२८६/२+२८७ /१, सि.स.क्र. ४७२८ ते ४७३० (पैकी) | झोपडपट्टी पुर्नवसन योजना | मे. पंचशील रिॲलिटी ॲण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड | सुधारित नियामावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत. | १३८८.९१ चौ.मी. (इमारत E चे जोते बांधकाम पुर्णत्वापोटीचा देय २५% देय टी.डी.आर.) | ००४६०३ | डिसेंबर २०२० |

विषय क्र.४०५

**संदर्भ-** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/TDR/५४२, दि.३०/१२/२०२० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.११४, दिनांक २२/०१/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या डी.आर.सी. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, महर्षी कर्वेनगर, स.नं. १३/१/१ (पैकी) हिंगणे बुद्रुक सि.स.नं. ५०१ (पैकी) | ३६ मी. डी.पी. रस्ता | १) मेट्रो डेव्हलपर्स तर्फे भागीदार सचिन सुमतीलाल लोढा २) विश्वनाथ विलास बगाटे | विरळ वस्ती | १८५.८१ चौ.मी. | १८५.८१ चौ.मी. X २.१० = ३९०.२० चौ.मी. | ००५८११ | डिसेंबर २०२० |
| २. | पुणे, महर्षी कर्वेनगर, स.नं. १३/१/४ हिंगणे बुद्रुक, सि.स.नं. ५०१ (पैकी) | | | | १८५.८१ चौ.मी. | १८५.८१ चौ.मी. X २.१० = ३९०.२० चौ.मी. | ००५८१२ | डिसेंबर २०२० |
| ३. | पुणे, महर्षी कर्वेनगर, स.नं. १३/१/६ हिंगणे बुद्रुक, सि.स.नं. ५०१ (पैकी) | | | | १८६.०० चौ.मी. | १८५.८१ चौ.मी. X २.१० = ३९०.२० चौ.मी. | ००५८१३ | डिसेंबर २०२० |

## नांव समिती निवेदन

विषय क्र.४०६

पुणे मनपा हद्दीतील उद्याने, रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत दि.१५/१/२०२१ ची सकाळी ११.२५ ( अकरा पंचवीस ) व दि. १५/१/२०२१ ची सकाळी ११.३० ( साडे अकरा ) वाजताची नांव समितीची दोन निवेदने विचारासाठी,

## मा.सभासदांचा प्रस्ताव

विषय क्र.४०७

संदर्भ – मा.सौ.राजश्री काळे यांची सूचना दि.२९/१/२०२१
१. मा. स्थायी समिती ठराव क्र. २०८०, दि. ३०/१२/२०११
२. मा. स्थायी समिती, ठराव क्र. ६६३ दि. ४/०९/२००७ व ठराव क्र. ९२ दि.२२/४/२०१३
३. मा. महापालिका आयुक्त, ठराव क्र. ६/१८५, दि. १७/७/२०१३.
४. मा. शिक्षण विभागाकडील पत्र शि.मं. आस्था/ जा.क्र. /२२६२,दि. २२/८/२०१७.
५. मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/४५७,दि.१६/१०/२०१७ चे पत्र
६. मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १४८ दि.२२/११/२०१७

७. मा.सौ.सुजाता शेट्टी,मा.अविनाश बागवे,मा.योगेश समेळ यांचे दि.१८/१२/२०१७ ची उपसूचना

८. मा.स्थायी समिती ठराव क्र. १६१३,दि.४/१/२०१८

९.मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.सुनिल कांबळे यांची दि. २१/२/२०१८ ची उपसूचना.

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन तसेच संदर्भ क्र.९ च्या उपसूचनेनुसार –

पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग, शिक्षण विभाग, भवन रचना विभाग व रेनबो फाऊंडेशन, १–१–७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्रराबाद–५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी, पुणे स्नेहालय, एकलव्य, समतोल, चैतन्य महिला मंडळ, राजश्री पारधी आदिवासी विकास परिषद यांचे संयुक्त सहकार्याने ६ ते १८ वयोगटातील पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणेस.

२) वर नमूद केलेल्या सर्व संस्थांमध्ये मुला/मुलींच्या संख्येनुसार पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग मार्फत शाळांच्या मोकळ्या वर्ग खोल्या, बंद पडलेल्या शाळा दिवस–रात्र निवारा प्रकल्प करीता उपलब्ध करून देणेस.

३) पुणे महानगरपालिका भवन रचना विभागामार्फत दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता वर्ग खोल्यांचे नुतनीकरण करणे, इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा व तद्नुषंगिक सोयी, सुविधा उपलब्ध करणेस.

४) रेनबो फाऊंडेशन,१–१–७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्रराबाद–५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी पुणे यांचे समवेत ३ वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस. तसेच स्नेहालय, एकलव्य, समतोल, चैतन्य महिला मंडळ, राजश्री पारधी आदिवासी विकास परिषद या संस्थाची मुदत ३ वर्षाची ठेवण्यात यावी.

५) रस्त्यावरील मुलांकरीता दिवस–रात्र निवारा करीता O&M cost उपलब्ध होणेसाठी मे. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस. दिवस–रात्र निवारा करीता O&M cost ला मान्यता मिळेपर्यंतचा संपूर्ण खर्च पुणे महानगरपालिका कडील उपलब्ध तरतूदमधून (FE14C208 – पुणे शहरातील रस्त्यांवरील मुलांकरीता मोबईल स्कूल सुरू करणे  र.रू. १०.०० कोटी) करणेस.

६) सदर प्रकल्पाच्या व्यवस्थापन करीता मे. राज्य शासनाकडून तरतूद उपलब्ध न झाल्यास पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी तरतूद उपलब्ध करणेस व त्यामधून खर्च करणेस.

७) बजाज फिनसर्व कंपनी – कंपनी सोशल रिसपॉन्सबिलिटी ॲक्ट अंतर्गत बजाज फिनसर्व कंपनीमार्फत विद्यार्थ्यांकरीता दिवस–रात्र निवारा उपलब्ध करणे अंतर्गत खर्च करणेस. या बाबतचा तपशिल या विषयक करणेत येणाऱ्या करारनामामध्ये दर्शविणेत आला आहे. सदर प्रकल्पासाठी सी.एस.आर. अंतर्गत उपलब्ध करून देणेत आलेली तरतूद व कार्याचा दरमहा अहवाल संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेकडे सादर करणेस.

८) गुरुदेव रविंद्रनाथ टागोर विद्यानिकेतन शाळा क्र.२ व बाबुजी अनाजी बारणे प्रशाला रात्र–निवारा प्रकल्पातून वगळणेस

९) एकूण १०४२७ मुला / मुलींपैकी रेनबो या संस्थेकडे १७५० मुलांसाठी काम द्यावे व उर्वरित ८६७७ मुला/मुलींसाठीचे काम स्नेहालय, एकलव्य, समतोल, चैतन्य महिला मंडळ, राजश्री पारधी आदिवासी विकास परिषद या संस्थांना देण्यात यावे.

१०) रेनबो संस्थेचे काम योग्य पध्दतीने न चालल्यास काम बंद करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असावेत.

११) सदर संस्थांची नेमणूक योग्य कार्यपध्दतीने अंमलबजावणी करून करावी.

१२) झालेल्या कामाचा त्रेमासिक अहवाल महापालिकेस सादर करावा.

१३) सर्व संस्थांच्या एक वर्षाच्या कार्यकाळानंतर अहवालाचा आढावा घेऊन मा.महापौराच्या आदेशाने करार नूतनीकरण करण्यात यावा.

असा मनपा ठराव क्र.१००५, दिनांक २१/२/२०१८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १. मा. स्थायी समिती ठराव क्र. २०८०, दि. ३०/१२/२०११

२. मा. स्थायी समिती, ठराव क्र. ६६३ दि. ४/०९/२००७ व ठराव क्र. ९२ दि.२२/४/२०१३

३. मा. महापालिका आयुक्त, ठराव क्र. ६/१८५, दि. १७/७/२०१३.

४. मा. शिक्षण विभागाकडील पत्र शि.मं. आस्था/ जा.क्र. /२२६२,दि. २२/८/२०१७.

५. मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/४५७,दि.१६/१०/२०१७ चे पत्र

६. मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १४८ दि.२२/११/२०१७

७. मा.सौ.सुजाता शेट्टी,मा.अविनाश बागवे,मा.योगेश समेळ यांचे दि.१८/१२/२०१७ ची उपसूचना

८. मा.स्थायी समिति ठराव क्र. १६१३,दि.४/१/२०१८

९.मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.सुनिल कांबळे यांची दि. २१/२/२०१८ ची उपसूचना.

-----

पुणे महानगरपालिका व रेनबो फाऊंडेशन यांचा संयुक्त प्रकल्प समाज विकास विभागांतर्गत चालू आहे. मा.मुख्य सभा ठ.क्र.१००५ दि.२१.२.२०१८ अन्वये पुणे महानगरपालिका, रेनबो फौंडेशन, बजाज फिनसर्व कंपनी, पुणे स्नेहालय, एकलव्य, समतोल, चैतन्य महिला मंडळ, राजश्री पारधी आदिवासी विकास परिषद यांचे संयुक्त विदयमाने सहकार्याने प्रकल्प करणेस मान्यता मिळाली आहे. परंतू सदर प्रकरणी फक्त रेनबो फौंडेशन या संस्थेबरोबर करार केलेला आहे. वास्तविक पाहता प्रशासकीय मान्यता घेवूनच सर्व संस्थांशी मिळून एकत्रितरित्या करार करणे कायदेशीररित्या आवश्यक असताना बेकायदेशीरपणे फक्त रेनबो फौंडेशन या संस्थेबरोबर करार केलेला आहे. सदर प्रकल्प चालविणेबाबत मुलामुलींबाबत चाईल्ड व वुमन्स कमिशन कडून आवश्यक असणारी कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी रेनबो फाऊंडेशन संस्था, बजाज फिनसर्व व पुणे महानगरपालिकेचे अधिकारी यांनी बेकायेदशीर व नियमबाहय रात्र निवारा प्रकल्प सुरू करून राज्य शासन, चाईल्ड व वुमन्स कमिशनची किंवा पोलीसांची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजिस्टर क्र.४५५/२०२० भा.द.वि.३६३ अन्वये दोन मुलींना अज्ञात इसमांनी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार रेनबो फाऊंडेशनच्या अधिका-यांनी केलेली आहे. ही घटना महापालिकेच्या मिळकतीमध्ये घडलेली असून सदर बाब अत्यंत गंभीर आहे.

मुख्य सभेच्या ठरावाची अंमलबजावणी ठरावाप्रमाणे न करता तसेच आवश्यक परवानग्या न घेता अल्पवयीन मुले मुली महानगरपालिकेच्या शाळेमध्ये ठेवून बेजबाबदार वर्तन केल्यामुळेच दोन मुलींचे अपहरण झालेले असल्याने रेनबो फाऊंडेशन संस्थेकडून कार्यरत असणारा प्रकल्प बंद करण्यात यावा.अशा घटना यापूर्वी चार ते पाच वेळा घडलेल्या असून याबाबत रेनबो संस्थेकडून महापालिकेस संयुक्त प्रकल्प असूनही तोंडी अथवा लेखी कोणत्याही पध्दतीने कळविलेले नाही.सबब सदर प्रकल्प अन्य संस्थांच्या माध्यमातून चालू ठेवावा.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/२/२०२१

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.